विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माणा करण्यात आलेल्या ८ राजपत्रित व २१६ अराजपत्रित अशी एकूण २२४ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : - डब्ल्यूएलपी ०३१७ /प्र.क्र.६५ /फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ जानेवारी, २०१८.

वाचावे :-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र कक्ष-३/योजनेतर/प्र.क्र.५०/१६-१७/१८७६, दिनांक ०४.०१.२०१७.
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि. १०.०२.२०१७.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : - डब्ल्यूएलपी ०३१७ /प्र.क्र.६५ /फ-१, दिनांक ०४.३.२०१७.
४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:- पदनि- २०१६/ प्र.क्र.०८/ आ.पु.क., दिनांक :- ०३.१०.२०१७.
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : - डब्ल्यूएलपी ०३१७ /प्र.क्र.६५ /फ-१, दिनांक ३१.१०.२०१७.
६. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि. ०८.०१.२०१८.

प्रस्तावना :-

विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या एकूण २२४ अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.०३.२०१७ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यत चालू ठेवण्याचा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये सादर केला आहे. **वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयानुसार** प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या एकूण २२४ अस्थायी पदांना संदर्भ **क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये** सन २०१७-१८ मध्ये **दिनांक ०१.०४.२०१७ ते दिनांक ३०.०९.२०१७** पर्यत तर **वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ४ च्या शासन निर्णयानुसार** प्रशासकीय

विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या एकूण २२४ अस्थायी पदांना संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ मध्ये **दिनांक ०१.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यत** मुदत वाढ देण्यात आली आहे.

आता **संदर्भ क्रमांक ६ च्या वित्त विभागाच्या** शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना **दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८** पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

<u>शासन निर्णय :-</u>

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या एकूण २२४ अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.०३.२०१७ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यत चालू ठेवण्याकरीता सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन **वित्त विभागाच्या संदर्भ ६ च्या शासन निर्णयान्वये** प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या एकूण **२२४** अस्थायी पदांना **दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८** पर्यत मूदतवाढ देण्यात येत आहे.

२. विशेष व्याघ्र संरक्षण दलाची (STPF) स्थापना या योजने अंतर्गत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर व पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचेकरीता निर्माण करण्यात आलेल्या ८ राजपत्रित व २१६ अराजपत्रित अशी एकूण २२४ अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६-वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवांचे संवर्धन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना केंद्र पुरस्कृत योजना, (००) ०४ व्याघ्र प्रकल्प (६० टक्के) (२४०६ १२४३) व २४०६, वनीकरण व वन्यजीवन ११० वन्यजीवांचे संवर्धन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजना (००) (२१) व्याघ्र प्रकल्प (४०% राज्य हिस्सा) (सर्वसाधारण) २४०६ ए१०२ या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. असंक - १००४ / प्र.क्र.१२ /(भाग-२) /२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०४.१०.२००४ व क्रमांक:- पदनि २०१६/ प्र.क्र.०८/१६/ आ.पु.क., दिनांक :- ०८.०१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२२१२०३३३५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.01.22 12:07:46 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधार व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
५. मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), म.रा.मुंबई/नागपूर.
७. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

****

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक डब्ल्यूएलपी ०३.१७/प्र.क्र. ६५/फ-१,

दिनांक :- २२ जानेवारी, २०१८ सोबतचे विवरणपत्र

****

दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली पदे

अ.क्र	पद	पदसंख्या
१	सहाय्यक वनसंरक्षक	२
२	वनक्षेत्रपाल	६
४	वनरक्षक	१६२
५	वन निरिक्षक	५४
	एकूण	**२२४**

****